प्रकरण चौथे : निवडक मराठी संगीत नाटककार आणि निवडक कोंकणी तियात्रिस्त

4.1	निवडक मराठी संगीत नाटककार
4.2	निवडक कोंकणी तियात्रिस्त
4.3	समारोप
4.4	संदर्भग्रंथ सूची

4.1 निवडक मराठी संगीत नाटककार

4.1.1 विष्णुदास भावे

ज्याची परंपरा पुढे सातत्याने विकसित झाली, अशी मराठी रंगभूमी खऱ्या अर्थाने सांगली येथे 1843 मध्ये उदयास आली. तेथील संस्थानिक चिंतामणराव पटवर्धन यांच्या आश्रयाखाली विष्णुदास भावे यांनी 'सीता-स्वयंवर' या नाटकाचा प्रयोग केला. अन् मराठीतील पहिले गद्य-पद्य मिश्रित नाटक जन्माला आले. हे नाटक सांगलीकरांना खूप आवडले. रसिकांची मागणी लक्षात घेऊन भाव्यांनी या नाटकाचे पुढे अनेक प्रयोग केले. त्यांची स्वतःची एक 'नाटक मंडळी' (म्हणजे संस्था) होती. या नाटक मंडळीने पुराण कथेवर आधारित असे अनेक नाट्य प्रयोग सादर केले. विष्णुदास भावे यांच्या नावावर पन्नास-साठ नाटके आहेत. परंतु ही नाटके आख्यानवजा आहेत. कर्मावतार, भरतभाव, पांडवांचा वनवास, दुर्वासभोजन, कीचकवध, रावणविटंबना अशा या सर्व नावांवरून नाटकांच्या कथानकांची कल्पना येते. ही सारीच नाटके यक्षगान, दशावतार, आख्यान या वळणावरची होती.

मराठी नाटकाला एक विशिष्ट अशी पद्धत निर्माण करण्याची कामगिरी विष्णुदास भावे यांनी केली. त्यासाठी स्वतंत्र संस्था काढून गावोगाव प्रयोग केले. पुण्या-मुंबईपर्यंत मजल मारली अन् भावी रंगभूमीची वाट खुली केली. या त्यांच्या कार्यामुळेच त्यांना 'महाराष्ट्राचा भरतमुनी' आणि 'रंगभूमीचा विश्वकर्मा' या नावाने ओळखले जाते. सूत्रधाराकडून मंगलाचरण, नंतर वनचरवेषधारी विदूषकाचा प्रवेश, त्याचे आणि सूत्रधाराचे विनोदी संभाषण, विघ्नहर्त्या गजाननाचे स्तवन, सरस्वतीस्तवन, गजानन व सरस्वती ह्यांचा आशीर्वाद प्राप्त झाल्यानंतर नाटकास प्रारंभ अशी विष्णूदासांच्या

नाट्यप्रयोगांची पद्धती होती. सर्वच भाषणे आधी लिहिलेली नसत. नट स्वयंस्फूर्तीनेही प्रसंगोचित भाषणे करत. त्यांच्या नाटकांना पखवाजाची प्रमुख साथ असे.

4.1.2 अण्णासाहेब किर्लोस्कर

मराठी नाट्यसृष्टीला आकार देणाऱ्या अण्णासाहेब किर्लोस्करांनी 1880 मध्ये 'शाकुंतल' या नाटकाचा प्रयोग केला म्हणून 1880 हे साल महत्वाचे ठरले. या नाटकाच्या पहिल्या प्रयोगानंतर मराठी रंगभूमीचे एक नवे पर्व सुरू झाले. हे नाटक उभे करण्यासाठी त्यांनी एका पार्शी नाटकमंडळीचा 'इंद्रसभा' या नाटकाचा गद्यपद्यात्मक प्रयोग पाहिला होता. आपणही असे नाटक का बसवू नये? हा विचार त्यांच्या मनी आला. पूर्वीपासून त्यांना नाटकाचे वेड होतेच, त्या वेडापोटीच त्यांनी 'उल्लाउद्दिनची चित्तुरगडावर स्वारी' व 'शांकर विजय' ही दोन नाटके लिहिली होतीच. हा अनुभव जमेस धरून त्यांनी कालिदासाच्या 'शाकुंतल' या संस्कृत नाटकाचे भाषांतर केले. हे नाटक सुरवातीला चार अंकी होते पण नंतर ते सात अंकी झाले. त्यातील पदे यमन कल्याण, भूप, विहाग, हमीर, मल्हार, जोगिया, इ. रागात आहेत. प्रासादपूर्ण रचना, स्पष्ट उच्चार, भरदार गायन, चालीतील विविधता, पौराणिक कथानक, विविध रसांचा परिपोष, इ. अनेक कारणांनी त्यांच्या नाटकांना अमाप प्रसिद्धी मिळाली.

'शाकुंतल' नाटकाला अफाट प्रतिसाद मिळत असतानाच स्वतंत्र नाट्यलेखनाची महत्वाकांक्षा बाळगून किर्लोस्करांनी 'संगीत सौभद्र' ची निर्मिती केली. हे पाच अंकी नाटक महाराष्ट्राचे वैभव ठरले. आज 100 वर्षांनंतरही या नाटकाचे प्रयोग होत आहेत म्हणून मराठी रंगभूमीवरचे चिरतरूण नाटक असा त्याचा उल्लेख केला जातो. कृष्ण-बलराम सारख्या पात्रांचे मानवीकरण या नाटकात झाले. या नाटकाच्या माध्यमातून पूर्वीच्या कृत्रिम, विजोड व अतिमानवी पौराणिक नाट्यसृष्टीला अण्णांनी लौकीकाची भूमी दाखविली. सुसंघटित व गतिमान कथानक यासोबतच पूर्वीच्या नाटकातील ओबडधोबडपणा, अव्यवस्थितपणा काढून टाकण्याचे महत्वाचे कार्य किर्लोस्करांनी केले. भावनेला स्पर्श करणारी व कथेला गती देणारी पदे. समाजात नट आणि नाटकाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.

4.1.3 गोविंद बल्लाळ देवल

गोविंद बल्लाळ देवल हे अण्णासाहेब किर्लोस्करांचे शिष्य. संगीत नाटकाची परंपरा पुढे नेण्याचे कार्य देवलांनी केले. कॉलेजमधील नाट्यलेखन स्पर्धेसाठी ‘दुर्गा’ हे नाटक त्यांनी रचले. बक्षिस मिळाल्यामुळे नाट्यलेखनाची प्रेरणा मिळाली. त्यांचे दुसरे नाटक म्हणजे संस्कृत नाटकावर आधारित ‘विक्रमोर्वशीय’ होय. सुमधूर पदांची जोड दिल्याने ‘मृच्छकटिक’ हे त्यांचे तिसरे नाटक खूपच लोकप्रिय झाले. ‘झुंझारराव’ आणि ‘शापसंभ्रम’ ही देवलांची अन्य रूपांतरित नाटके होय. ‘संशयकल्लोळ’ या रूपांतरित नाटकात त्यांनी मूळच्या विलायती कथानकाला अन् त्यातील पात्रांना खास भारतीय साज चढविला. विशेष- चटकदार संवाद, भावमधूर पदे व गतीमान कथानक, स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोद यामुळे हे नाटक लक्षवेधी ठरते.

बाल-जरठ विवाहाचा प्रश्न रंगभूमीवर मांडण्याच्या उद्देशाने देवलांनी ‘संगीत शारदा’चे लेखन केले. देवलांना ‘सामाजिक नाटकाचे जनक’ ही पदवी मिळवून देणारे ‘शारदा’ हे मराठीतील पहिले सामाजिक नाटक आहे. वैशिष्ट्यपूर्ण संवादातून यात विनोदाची लयलूट केली आहे परंतु त्याचा मुख्य रस करूण आहे. परिणामकारक संवाद, सामाजिक आशय, मिश्किल विनोद, रेखीव पात्ररचना, कारूण्यमय प्रसंग, श्रवणीय पदे हा या नाटकाचा सर्वात मोठा गुण असून समाजाचे वास्तवपूर्ण चित्रण असलेले हे नाटक समाजपरिवर्तनासाठी उपयुक्त ठरले.

‘संशयकल्लोळ’ या हटकून रंगणाऱ्या सुखात्मिकेवरून देवलांच्या असाधारण रूपांतरकौशल्याची साक्ष पटते. संस्कृतमधील व इंग्रजीतील सरस नाटकांचे तितक्याच सरस पद्धतीने भाषांतर करून मराठी नाट्यक्षेत्र समृद्ध केले तसेच उत्कृष्ट रूपांतराची दिशा दाखविली. वास्तववादी, सामाजिक नाटकांची सुरूवात देवलांनी केली तसेच नाटकाला सामाजिक नाटकाची प्रतिष्ठा मिळवून दिली.

4.1.4 कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर

खाडीलकरांनी एकंदर 15 नाटके लिहिली ज्यात 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'कांचनगडची मोहना', 'कीचकवध', 'बायकांचे बंड', 'भाऊबंदकी', 'प्रेमध्वज', 'संगीत मानापमान', 'संगीत विद्याहरण', 'संगीत स्वयंवर', 'संगीत द्रौपदी', 'संगीत मेनका', 'सवतीमत्सर', 'संगीत सावित्री', 'संगीत त्रिदंडी संन्यास' (सात गद्य नाटके, आठ संगीतप्रधान नाटके, नऊ पौराणिक नाटके, दोन ऐतिहासिक नाटके) 'कांचनगडची मोहना' हे ऐतिहासिक वाटणारे पण कल्पनाप्रधान नाटक आहे. तर 'मानापमान' हे त्यांचे स्वतंत्र, कल्पनारम्य व अजरामर असे नाटक आहे.

त्यांची नाट्यप्रतिभा सदैव इतिहासकाळात आणि पुराणकाळात रमली. त्या काळातील व्यक्ती आणि घटना यांत दडलेल्या प्रभावी नाट्याने त्यांच्या प्रतिभेला सतत आकर्षून घेतले. त्याचा तिने वर्तमानाच्या संदर्भात अर्थ लावला. भूताचा अर्थ वर्तमानाच्या संदर्भात लावणे, भूताचे वर्तमानाशी असणारे नाते व्यक्त करणे हा सदर प्रतिभेचा सहजधर्मच होता. तिला सतत भूतात वर्तमान दिसले व त्या दृष्टीने परिणामकारक नाट्यदर्शन घडविण्याचा तिने प्रयत्न केला.

खाडीलकरांची नाटके सहेतूक आणि ध्येयवादी दृष्टीने निर्माण झाली आहेत. पौराणिक कथानकाचा वापर मोठ्या चतुराईने करून राष्ट्रप्रेमाचा संदेश देणारी नाटकी त्यांनी लिहिली. राजकीय, सामाजिक व वैयक्तिक ध्येयाची उदात्त चित्रे रंगवून त्यांनी नाट्यकला ही केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर तिचा उपयोग जनतेत ध्येयवाद रूजविण्यासाठी करता येतो हे दाखवून दिले. नाट्यकृतीतून अत्यंत तेजस्वी आणि वीररसाने भारलेली जीवनदृष्टी पुरस्कृत केली. खाडीलकरांच्या नाटकात एखाद्या प्रभावी व्यक्ती विरूध्द परिस्थिती असा संघर्ष दाखविलेला आहे. कमीत कमी साधनामध्ये जास्तीत जास्त परिणाम घडवून आणणे हे त्यांच्या नाटकाचे मर्म होते.

4.1.5 राम गणेश गडकरी

वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी, अवघ्या तीन दिवसांत 'सुरसुंदरी' या नाटकाची निर्मिती गडकऱ्यांनी केली. पुनर्विवाहाची समस्या मांडणाऱ्या 'प्रेमसंन्यास' या नाटकामुळे नाटककार म्हणून त्यांना ओळख प्राप्त झाली. या नाटकात विधवांच्या जीवनातील दुःखाचे चित्रण केले आहे. 'पुण्यप्रभाव', 'एकच प्याला', 'भावबंधन', 'राजसंन्यास' ही त्यांची लोकप्रिय संगीत नाटके होय.

काव्यसृष्टी, नाट्यसृष्टी, विनोदी, ललित लेखन या साहित्याच्या प्रांतात देखील त्यांनी विशेषत्वाने लेखन केले. त्यांच्या नाटकांतून उत्तुंग कल्पनाशक्तीचा आणि बुद्धीवैभवाचा प्रत्यय येतो. शब्दक्रीडा हा त्यांच्या लेखनाचा उत्तम गुण असल्याचे दिसून येते. आपल्या भाषाप्रभुत्वाच्या जोरावर व असामान्य कल्पनाशक्तीच्या अपूर्व विलासाच्या साहाय्याने मराठी नाट्यसृष्टीत ते विशेष ठरतात. व्यक्तिचित्रांचे सुरेख दर्शन, सुरम्य भाषाशैली, कल्पक कथानकांची निर्मिती, चटकदार संवाद, सुंदर कोट्या हे गडकऱ्यांच्या नाट्यलेखनाचे वैशिष्ट्य म्हणता येते. त्यांच्या नाटकांमध्ये तत्कालीन सामाजिक प्रश्न येतात हे देखील त्यांच्या नाटकांचे वेगळेपण ठरते.

त्यांच्या नाटकात विनोदालाही महत्वाचे स्थान मिळाले असल्याचे दिसून येते. त्यांच्या नाटकातील मध्यवर्ती पात्रांच्या जोडीनेच काही विनोदी पात्रेदेखील रंगभूमीवर अतिशय लोकप्रिय झाली. गडकरी हे कोल्हटकरांचे शिष्य असले तरी त्यांचा विनोद पूर्णपणे स्वतंत्र होता आणि त्याचा दर्जा अतिशय उच्च होता. त्यांच्या विनोदातूनही त्यांच्या अलौकिक प्रतिभेचा साक्षात्कार होतो. शब्दांची मार्मिक निवड व भावनेची उत्कटता या गुणांचा संगम गडकऱ्यांच्या लेखनशैलीत आढळतो. हास्यरस, करूणरस, रौद्ररस इ. रसांचा आपल्या साहित्यात परिणामकारकपणे वापर करण्याची विलक्षण हातोटी त्यांना साधली होती. करूणरसाने ओथंबलेल्या नाटकात देखील हास्यरसाचा वापर लक्षवेधी आहे. त्यांची कल्पनाशक्ती उच्छृंखल आहे, कलादृष्ट्या प्रस्तुताप्रस्तुताचा विवेक करण्याचे सामर्थ्य तिच्या ठायी तितकेसे नाही. तिचा स्वाभाविक कल अतिशयोक्तीकडे आहे परंतु असे असूनही त्यांच्या सर्वच लेखनात वाचक-प्रेक्षकांच्या मनाची पकड घेण्याचे विलक्षण सामर्थ्य अवतरलेले आहे. उत्कटता हा त्यांच्या वृत्तीचा सहजधर्म आहे.

4.1.6 विनायक दामोदर सावरकर

'सं. उःशाप', 'सं. संन्यस्त खड्ग', 'सं. उत्तरक्रिया' अशी तीनच नाटके लिहून सावरकरांनी नाट्यसृष्टी समृद्ध आणि संपन्न केली. त्यांच्या नाटकांचे विषय हृदयाला सतत जाळणारे, मस्तकाला सतत चिंतनाचे खाद्य पुरवणारे आणि कृतीप्रवण करणारे आहेत. 'उःशाप' हे नाटक अस्पृश्यतानिवारण हा विषय हाताळते. 'उत्तरक्रिया' हे ऐतिहासिक नाटक पानिपताच्या लढाईवर आधारित आहे.

'संन्यस्त खड्ग' या नाटकात गौतम बुद्धांच्या जीवनातील घटना घेतलेल्या आहेत. शब्दशक्तीचे महत्व पटवून देणे हा या नाटकाचा उद्देश दिसून येतो. बौद्ध धर्मातील अहिंसा तत्वाचा जीवनात होणारा पराभव, त्याची निष्फळता दाखवून देश सशस्त्र आणि बलसज्ज असावा, असे नाटकात सुचवले आहे. बुद्ध अर्थातच संन्यास धर्म आणि अहिंसा यांचे मंडन केले आहे. सावरकरांच्या तीनही नाटकांची कथाबीजे ध्येयवादी दृष्टीची आहेत. 'नाटकाकडे केवळ आनंद निर्मिती म्हणून न पाहता, संसार कसा असावा हेही नाटकात दाखवले पाहिजे,' असे ते म्हणतात. शस्त्रसामर्थ्यावरचा त्यांचा अपरंपार विश्वास त्यांच्या तिन्ही नाटकांत जाणवतो. त्यांच्या नाटकातील पुरूष पात्रे पौरूषसिद्धीसाठी निःस्वार्थ, ध्येयवेडी, तत्त्वनिष्ठ दिसतात तर स्त्री पात्रांचेही स्त्रीत्व, सौकुमार्य, लावण्य दैवी, नैसर्गिक देणगीपेक्षा तेजस्वी दिसतात. एक प्रचारक आणि निष्ठावंत कलावंत असे सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्यांच्या नाटकातून दिसते.

4.1.7 प्रल्हाद केशव अत्रे

बुडत चाललेल्या रंगभूमीला सावरण्याचा प्रयत्न अत्रे यांनी केला. विडंबनपर, चुरचुरीत, विनोदपूर्ण नाटके लिहिली. 'साष्टांग नमस्कार', 'घराबाहेर', 'उद्याचा संसार', 'जग काय म्हणेल', 'लग्नाची बेडी', 'वंदे मातरम्', 'मी उभा आहे', 'मोरूची मावशी', 'कवडीचुंबक', 'भ्रमाचा भोपळा', 'ब्रह्मचारी', 'बुवा तिथे बाया', 'मी मंत्री झालो', 'तो मी नव्हेच' अशी विपुल नाट्यसंपदा अत्र्यांच्या नावे आहे. काळाच्या पुढे जाऊन त्यांनी नाट्यलेखन केले. करूण गंभीर नाटकांमधून समाजातील स्त्रीच्या व्यक्तिमत्वाची कुचंबणा प्रभावीपणे चित्रित केली. समकालीन गाजलेल्या खटल्यांवर वा प्रश्नांवर आधारित नाटके त्यांच्या लेखणीतून प्रस्तुत झाली.

प्रहसनात्मक व विनोदी नाट्यदृष्टी ठेवत त्यांनी मराठी रंगभूमीच्या तत्कालिक गरजांचा चपखल मेळ बसवला. गुरूस्थानी मानलेले गडकरी व फ्रेंच प्रहसनकार मॉलिएर यांचा प्रभाव अत्र्यांच्या नाटकांवर पडलेला दिसतो. त्यांच्या नाटकांत सामाजिक दोषदर्शन व दंभस्फोट आहेत. पण उपहास, उपरोध, विडंबन व अतिशयोक्ती या विनोदसाधनांच्या द्वारा ते प्रकट केले आहेत. त्या काळात विशेष अनुकरणीय ठरलेल्या इब्सेन या नॉर्वेजियन नाटककाराचा संस्कार या दोन नाटकांवर

झाल्याचे जाणवते. अवकळलेल्या मराठी रंगभूमीचा लोकाश्रय टिकवून ठेवण्यात त्यांची नाटके यशस्वी झाली. त्यांची लोकप्रिय नाटके पूर्वकालीन नाटकांच्या तुलनेने अधिक प्रत्यक्षदर्शी आहेत. मराठी रंगभूमीवरील अखंड प्रयोगशीलतेच्या व तीव्र स्पर्धेच्या या कालखंडातही त्यांची सर्वच नाटके लोकप्रिय ठरली. विनोदप्रधान नाटकांची नवी परंपरा त्यांनी घडविली.

4.1.8 भार्गवराम वरेरकर

1920 नंतर मराठी रंगभूमीला सावरण्याचे कार्य वरेरकर यांनी केले. तत्कालीन समाजामध्ये मोठे बदल होत होते. असहकार, अहिंसा, सत्याग्रह, मजूर चळवळ, स्त्री स्वातंत्र्य, अस्पृश्यता निवारण, इ. प्रश्न समाजासमोर होते. या प्रश्नांना नाट्यरूप देण्याचे कार्य त्यांनी केले. ‘संन्याशाचा संसार’, ‘सोन्याचा कळस’, ‘तुरूंगाच्या दारात’, ‘कोरडी करामत’, ‘सत्तेचे गुलाम’, ‘अपूर्ण बंगाल’, ‘हाच मुलाचा बाप’, ‘उमलती कळी’, ‘सिंगापुरातून’ ही त्यांची काही महत्त्वाची सामाजिक नाटके होय. त्यांनी रंगमंचतंत्रांमध्ये बदल केले. त्याचा परिणाम पुढे दीर्घकाळ राहिला. मराठी रंगभूमीवरील प्रदीर्घ नाटकाची परंपरा बदलून त्यांनी दोन-तीन अंकी नाटक केले तसेच पदांची संख्या कमी केली. मराठी नाटक वास्तववादी व सुटसुटीत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला. समाजातील सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या महत्वपूर्ण प्रश्नांना हात घालणारे विषय त्यांनी आपल्या नाटकांसाठी निवडले. मराठी रंगभूमीवर माजलेले अवाजवी प्रस्थ त्यांनी कमी केले.

वरेरकरांची दृष्टी आधुनिक व प्रयोगशील होती. नाटकातल्या स्वगतांना त्यांनी फाटा दिला. एक अंक एक प्रवेश हे रचनातंत्र त्यांनी यथावकाश स्वीकारले. तत्कालीन राजकीय, सामाजिक आंदोलनांचे पडसाद त्यांच्या नाटकात उमटले. हुंड्याचा प्रश्न, पतितपरावर्तनाचा प्रश्न त्याचप्रमाणे पुरूषप्रधान संस्कृतीवर हल्ला चढविण्यासारखे विषय त्यांनी हाताळले. प्रचारकी धोरण, अतिरंजितपणा, काव्यात्मतेचा अभाव हे त्यांच्या नाटकातील दोष म्हणता येतात. बहुजनांना सहज कळेल अशी साधी-सोपी वाक्ये, स्वाभाविक संवाद यांचा वापर करत त्यांनी साध्या-सोप्या व्याकरणशुद्ध भाषेत नाट्यलेखन केले. समाजातील प्रत्येक समस्या शहरातील मध्यमवर्गासह, ग्रामीण भागातील बहुजन समाजापर्यंत त्यांनी आपल्या नाटकांद्वारे नेऊन पोहोचवली.

4.1.9 मोतीराम गजानन रांगणेकर

1940 च्या दरम्यान मराठी रंगभूमीवर मोठी पोकळी निर्माण झाली. त्यावेळी वृत्तपत्रसृष्टीचा त्याग करून रांगणेकरांनी रंगभूमीवर पदार्पण केले. 'आशीर्वाद', 'नंदनवन', 'कुलवधू', 'कन्यादान', 'अलंकार', 'माझे घर', 'वहिनी', 'एक होता म्हातारा', 'माहेर', इ. नाटके रांगणेकरांनी लिहिली. सामाजिक समस्या, जिवंत व उत्कट प्रसंग, परिणामकारक संवाद, माफक संगीत व अभिनय या गुणांमुळे त्यांचे 'कुलवधू' नाटक अतिशय लोकप्रिय झाले. त्यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीबद्दल प्रेक्षकांच्या मनात आपुलकी, जिव्हाळा निर्माण केला. एकांकी, एकप्रवेशी तंत्राने लिहिलेल्या नाटकांतून मध्यमवर्गीय कुटुंबातील प्रचलित प्रश्न रांगणेकरांनी सुटसुटीतपणे मांडले. स्त्रियांच्या भुमिका स्त्रियांनी करण्यावर तसेच नेपथ्य वास्तववादी ठेवण्यावर त्यांचा कटाक्ष होता.

4.1.10 श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

'वीरतनय', 'मूकनायक', 'गुप्तमंजुष', 'मतिविकार, 'प्रेमशोधन', 'वधूपरीक्षा', 'सहचारिणी', 'परिवर्तन', 'जन्मरहस्य', 'शिवपावित्र्य', 'श्रमसाफल्य' आणि 'मायाविवाह' अशी एकूण 12 नाटके कोल्हटकरांनी लिहिली. पाश्चात्य नाटककारांची छाप त्यांच्या नाट्यलेखनावर दिसून येते. तत्कालीन काळापेक्षा वेगळा कोटीबाज आणि शब्दनिष्ठ विनोद नाटकांमधून मांडला. मराठी नाट्यसृष्टीला कल्पनाप्रधान नाटकांची देणगी कोल्हटकरांनी दिली. अद्भुतता, रहस्यमयता, नवलपूर्णता, पद्यांच्या नवीन उडत्या चाली, पराकोटीचे कृत्रिम कथानक, काव्यात्मकता, खटकेबाज, चटकदार आणि मार्मिक संवाद हे त्यांच्या नाट्यलेखनाचे विशेष म्हणता येतात. आधीची नाटके बहुतेक नाटके पौराणिक असत त्यामुळे स्वतंत्र नाटके रचून कोल्हटकरांनी नवी क्रांती केली. त्यांनी नाटकातील पदे फारशी, गुजराती चालीवर बसवली तसेच स्वतंत्र कल्पनारम्य कथानके बनविली व नाटकामध्ये विनोदाला स्थान निर्माण केले. त्यांच्या पदरचनेने रंगभूमीवरील संगीताला वेगळे आणि आकर्षक वळण लावले.

कथा, स्वभावरेखाटन, संवाद, पदे या नाटकातील महत्वाच्या घटकांत त्यांनी नाविन्य आणले. रहस्यपूर्ण, गुंतागुंतीचे कथानक साकारताना त्यांनी स्त्री शिक्षण, मद्यपान निषेध, प्रीतीविवाह हे सुधारणाविषयक तसेच पुनर्विवाह, केशवपन, भ्रूणहत्या हे सामाजिक विषय मांडले. प्रसंगी नाटकातील प्रणयाला विनोदाची जोड देऊन श्लेष, चमत्कृती, उपहास, विडंबन, या विविध प्रकारांचा समावेश केला. 'वीरतनय' या नाटकात त्यांनी उर्दू व गुजराती चालींची पदे घालून अभिनव प्रयोग केला. कृत्रिमता, वैचित्र्य यामुळे प्रेक्षकवर्ग त्यांच्या नाटकाकडे वळला पण त्यातल्या नाविन्याची ओढ संपताच त्याने अशा नाटकांकडे पाठ फिरविली त्यामुळे कोल्हटकरांची नाटके अल्पजीवी ठरली.

4.1.11 पुरूषोत्तम दारव्हेकर

दारव्हेकरांच्या नाट्यलेखनाने पुन्हा एकदा व्यावसायिक रंगमंचावर संगीत नाटक लोकप्रिय झाले. संगीत नाटकाच्या अस्वाभाविकतेवर केलेल्या आरोपांची प्रतिक्रिया म्हणून त्यांनी गायक-संगीत घराणी यांच्या संदर्भातले विषय प्राधान्याने निवडले तसेच लहान मुलांसाठी नाटकांची निर्मिती केली. 'वऱ्हाडी मानसं', 'अबोल झाली सतार', 'सं. कट्यार काळजात घुसली' ही त्यांची गाजलेली नाटके होय. परंतु पारंपरिक चौकटीत नाट्यसंघर्षाची बांधेसूद रचना, नाट्यनुभवाचा आकर्षक सोपेपणा आणि विनोदाचा, उपकथानकांचा सांकेतिक वापर यामुळे ही नाटके लोकप्रिय ठरली.

4.1.12 बाळ कोल्हटकर

वेगाने पुढे जाणाऱ्या औद्योगिकरणात माणूस स्वाभाविकपणे हरवणारे जग मुठीत घट्ट पकडण्याचा प्रयत्न करतो हा मुद्दा त्यांच्या 'सं. दुरितांचे तिमिर जावो' नाटकाच्या केंद्रस्थानी आहे. भावनाप्रधान आणि कौटुंबिक स्वरूपाची अशी त्यांची नाटके आहेत. नाटकाला येणारा सुशिक्षित मध्यमवर्ग लक्षात घेऊन त्यांनी आपल्या नाटकाची संहिता ठरविली होती. त्यांच्या नाटकातील संवाद व गीते काळजाला भिडणारी तसेच डोळ्यांत अश्रू आणणारी असत. पौराणिक व ऐतिहासिक विषयही हाताळले. अनुभवाची जोड आणि निरीक्षणाची बाजू भक्कम असल्याने त्यांची लेखणी ही सर्वसामान्य, मध्यमवर्गीयांना आपलीशी वाटली. त्यांच्या नाटकातील पात्रे प्रेक्षकांना आपल्या

जवळची वाटत. त्यांच्या नाटकातील प्रसंग नाट्यमय असले, शाब्दिक कमाल करणारे असले, तरी ते आपल्या अवतीभोवती घडलेले असे वाटतात.

4.1.13 विद्याधर गोखले

विद्याधर गोखले यांनी ‘पंडितराज जगन्नाथ’ हे नाटक रंगभूमीवर आणून मराठी संगीत नाटकाला संजीवन दिले. संगीत नाटकांच्या परंपरेचा वारसा त्यांनी चालविला. ऐतिहासिक, पौराणिक आणि सामाजिक विषय हाताळले. नाट्यात नृत्ये योजण्याचा उपक्रमही त्यांनी सुरू केला.

4.1.14 गोपाळकृष्ण भोबे

संगीतसम्राट तानसेनच्या जीवनावर आधारित ‘धन्य ते गायनी कळा’ हे संगीतप्रधान नाटक लिहून त्यांनी नाट्यलेखनात प्रवेश केला. व्यक्तीप्रधान अशा स्वरूपाचे हे संगीत नाटक लिहून त्यांनी मराठी संगीत नाटकांचा एक नवा उपप्रकार प्रस्थापित केला.

4.1.15 हिराबाई पेडणेकर

आद्य स्त्री नाटककार म्हणून हिराबाई पेडनेकर यांचा उल्लेख करावा लागतो. ‘जयद्रथ विडंबन’ या पौराणिक कथानक असलेल्या नाटकाद्वारे नाट्यलेखनाचा प्रारंभ. स्त्री शिक्षणाविषयी हिराबाईंना कळकळ होती. ‘संगीत दामिनी’ मध्ये त्यांच्या या विचारांचे प्रतिबिंब दिसते. त्यांनी लिहिलेली ‘जयदेवाची पत्नी’, ‘मीराबाई’ ही नाटके मात्र फार गाजली नाहीत. स्त्री-पुरुष सहजीवनाविषयी त्यांचे विचार काळाच्या पुढचे होते. त्यांच्या संवादलेखनातून पात्रांच्या मनोवस्था, त्यामागची कारणे, परंपरा हे विचारपूर्वक योजलेले दिसते. त्यांचे संगीतज्ञान नाट्यपदलेखनात उपकारक ठरले. त्यांच्या प्रत्येक पदांच्या चालींमध्ये विविधता असे. ‘ज्ञानमार्गात स्त्री-पुरूष भेद नसावेत, ते कृत्रिम आहेत’ असा विचार त्यांनी मांडला. शिक्षित स्त्री अधिक परिपक्व असते आणि ती जीवनाला समर्थपणे सामोरी जाते असेही मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या कथानकात

नाट्यमयता पुरेपूर होती. चमत्कृतीपूर्ण प्रसंग, ताटातूट, पुनर्भेट, बुवाबाजीवर प्रहार असे अनेक घटक त्यांनी आपल्या नाटकांमधून सुजाणपणे वापरले.

4.1.16 रणजीत देसाई

'गरूडझेप', 'रामशास्त्री', 'स्वरसम्राट तानसेन', 'हे बंध रेशमाचे', 'कांचनमृग', 'धन अपुरे', 'वारसा', 'स्वामी' ही आदर्श जीवनमूल्यांचा वेध घेणारी त्यांची नाटके होय. रणजित देसाईंच्या नाटकात नाट्यविषयांचे वैविध्य दिसून येते. त्यांच्या 'हे बंध रेशमाचे' या नाटकातील पदे शांता शेळके यांनी लिहिली. एखाद्या संगीत नाटककाराच्या नाटकातील पदे इतर कुणा व्यक्तीने लिहिण्याचा प्रघात प्रथमच या निमित्ताने पडला.

4.2 निवडक कोंकणी तियात्रिस्त

4.2.1 लुकासीन रिबेरो

'इटालियन भुरगो' या पहिल्यावहिल्या 'तियात्रा'चे लेखन करणारे लुकासीन रिबेरो यांनी 'तियात्र' या रोमी कोंकणी साहित्यकलाप्रकाराचा पाया घातला. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकांत गोमंतकातील अनेक तरुण कामानिमित्त मुंबईत जात असत. त्यातीलच एक म्हणजे लुकासीन रिबेरो. इटालियन ऑपेरा पाहून त्याच धाटणीचे काहीतरी कोंकणी भाषेतून सादर करावे असा मानस धरून लुकासीन रिबेरो यांनी उच्च दर्जाचे नाट्यसादरीकरण करण्याचा संकल्प केला. इटालियन ऑपेरा कंपनी या संस्थेत काम केल्यानंतर काही काळाने त्यांनी ती नोकरी सोडली आणि स्वत:चे पहिले 'तियात्र' लिहिले. कथानक, संगीत, नाच आणि गीत असे विविध चार घटक असलेल्या 'तियात्रा'चे सादरीकरण 17 एप्रिल 1892 या दिवशी त्यांनी केले. समकालीन सामाजिक प्रश्न मांडणारे हे 'तियात्र' 'गोवा पुर्तुगेज ड्रामाटीक कंपनी' च्या माध्यमातून सादर झाले. पाच व्यक्तींच्या मंडळाद्वारे सादर झालेल्या या चमूमध्ये, नंतरच्या काळात 'पाय तियात्रिस्त' हा सन्मान प्राप्त झालेले जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस देखील होते. लुकासीन रिबेरो यांना जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस आपले गुरू

मानत. ‘अल्लादीन आनी ताचो ओजाप्यांचो दिवो’, ‘अलीबाबा आनी चाळीस चोर’, ‘कार्लोस माग्नो’ ही भाषांतरित ‘तियात्र’ त्यांनी लिहिली. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्याने त्यांचे ‘तियात्र’ भाषिकदृष्ट्या दर्जेदार असत. ‘रिबेरो ॲण्ड डिक्रूझ ऑपेरा कंपनी’ ही संस्था त्यांनी सुरू केली. गोव्यात ‘तियात्रा’चे पहिले सादरीकरणही त्यांनीच, 1 जानेवारी 1894 या दिवशी आसगाव येथे केले.

4.2.2 जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस

जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस यांच जन्म 14 डिसेंबर 1871 या दिवशी गोव्याच्या मडगांव शहरात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण गोयातील राशोल सेमिनारीत, पोर्तुगीज भाषेत झाले. त्यानंतर मुंबईच्या सेन्ट झेवियर हायस्कुलमध्ये मॅट्रीक पर्यंत शिक्षण घेऊन त्यांनी काही काळ नोकरी केली. जुआंव आगोस्तीन यांची पत्नी रेजिना फेर्नांडीस ही ‘तियात्र’ रंगमंचावरील पहिली स्त्री अभिनेत्री. जुआंव आगोस्तीन यांच्या कुटुंबियांनी अनेक ग्रामोफोन तबकड्यांवर ध्वनीमुद्रण देखील केले आहे.

लुकासीन रोबेरो यांनी ‘तियात्रा’ची सुरुवात केली परंतु त्यानंतरच्या काळात ‘तियात्रा’ला व्यापक अर्थ, ‘तियात्रा’ची घडण आणि त्याचा विस्तार करण्याचे महत्त्वाचे कार्य जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस यांनी केले. याच कारणामुळे त्यांना ‘पाय तियात्रिस्त’ हा मान मिळाला. लुकासीन रिबेरो यांनी ‘दों कार्लुश ड्रामॅटिक कंपनी’ ही स्वत:ची ‘तियात्र’ कंपनी सुरू केली. सुमारे पन्नास वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत त्यांनी तीस पेक्ष अधिक ‘तियात्रां’चे लेखन केले आणि त्यातील सोळा-सतरा ‘तियात्र’ रंगमंचावर सादर झाली. मोलिएर, शेक्सपिअर आणि अलेक्झांडर ड्यूमास यांच्या अनेक नाटकांच्या रूपांतरांचा त्यात समावेश होतो. ‘तियात्रा’च्या भविष्याचा विचार करताना संहिता प्रकाशित करण्याची गरज त्यांना जाणवली आणि त्यांनी ‘भाटकारा-1’ हे ‘तियात्र’ 1909 साली तर ‘भाटकारा-2’ हे ‘तियात्र’ 1916 साली प्रकाशित केले. 1937 साली ‘भाटकारा’, ‘वेन आनी पाद्री जुजे वाझ’ तसेच ‘दोतीचें केंस्ताव’ ही तीन ‘तियात्र’ एकत्रितपणे एकाच ग्रंथात संकलन रूपाने प्रकाशित केली. दुसऱ्या संकलनात त्यांनी ‘भाटकारा-2’, ‘बेबदो’, ‘बेल ऑफ कांवेल’, ‘पांडुरंग कुसमोनकार’ ही ‘तियात्र’ एकत्रितपणे प्रकाशित केली. तिसऱ्या ग्रंथात ‘गोराल्दीना’ आणि ‘रुक्मीबाय राण्याचें त्रासांव’ ही दोन ‘तियात्र’ तर पाचव्या संकलनात ‘म्हजो खापरी चाकोर’,

'प्रोफेसर लेंताव', 'बोमबोयचो तेलिग्राफिस्त', 'दोगूय वोयज आनी तेग जाण तुब्बोकार' तसेच त्यांचे अतिशय प्रसिद्ध 'तियात्र' 'कुणबी जाकी' यांचे संकलन रूपाने पुस्तक प्रकाशित केले.

'कुणबी जाकी' यां त्यांच्या 'तियात्रा'त स्थानिक लोकांचे आयुष्य, त्यांच्या जीवनमानाचे वर्णन आणि त्यांचे स्वभावदर्शन त्यांनी घडवले आहे. 'पांडुरंग कुसमोणकार' या 'तियात्रा'त त्यांनी हिंदू पात्रांचा अभिनय, भाषाशैली यानुरूप 'तियात्रा'ची मांडणी केली आहे. लेखन आणि रचनातंत्रातील त्यांच्या याच वेगळेपणामुळे त्यांची तियात्रे लोकप्रिय ठरली. त्यांनी 'तियात्र' लेखन आणि दिग्दर्शन अशा दोन्ही स्तरांवर आपले योगदान दिले. सर्वार्थाने आपले 'तियात्र' तयार झाल्याशिवाय ते त्याचे प्रयोग करत नसत. या त्यांच्या वृत्तीवरून 'तियात्रा'विषयीची त्यांची कमालीची शिस्त आणि श्रद्धा लक्षात येते. 'तियात्र' लेखनासोबतच त्यांनी स्फूट गद्य लेखनही केले. विविध नियतकालिकांतून त्यांनी सामाजिक विषयांवर लेखन केले. आपल्या लेखांतून कुणबी गीते सार्वजनिक मंचावर आणण्यात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. 1910 साली एच्. एम्. व्ही. कंपनीतर्फे त्यांची पहिली ध्वनीमुद्रिका प्रसिद्ध करण्यात आली. त्यात त्यांच्यासोबत त्यांची पत्नी रेजिना तसेच कन्या सोफिया यांनी देखील गायन केले. लोकांच्या आणि विशेषत: कुणबी समाजाच्या जीवनाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. 'तियात्र' हे त्यांचे महत्त्वाचे साधन बनवून लोकांच्या प्रश्नांना आपल्या अभ्यासपूर्ण शैलीतून गीतांच्या माध्यमातून मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

4.2.3 सायब रोचा

दुमिंगोस जुझे रोचा अर्थात 'सायब रोचा' हे एक 'तियात्र' लेखक आणि दिग्दर्शक होते. एल्. सी. डी. ब्रागांझा, लुकासीन रिबेरो , डग्लस फेर्नांडीस, सेबास्तियांव गाब्रियाल कराचीवाला, रॉगासियान डिसोझा यांच्या 'तियात्रां'च्या प्रभावातून त्यांनी 'तियात्र' लेखनाला सुरुवात केली. 'जोनेवेवा दे ब्राबो' हे त्यांनी लिहिलेले पहिले 'तियात्र' होय. 1916 साली त्यांनी 'युनियन जॅक ड्रामाटिक कंपनी' ही संस्था सुरु केली. काही काळाने या संस्थेत झालेल्या वादांमुळे अनेकांनी ही संस्था सोडली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सुमारे साठ 'तियात्र' लिहिले. सायब रोचा हे नाट्यशास्त्राचे विद्यार्थी असल्याने तसेच इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्याने त्यांनी शेक्सपियरची नाटके

भाषांतरित करून सादर केली. 'दुबावी घोरकान्न', 'नोकेत्र इतालिया शाराचें', 'गुपीत काजार', 'मोग आनी क्रीम', 'काल्साद नोवरो', 'घोर जावूंय', 'सन ऑफ जेरुजाले', 'आंकवाराचो सोंवसार', 'रोमियो आनी ज्युलिएट', 'दोत', 'मि. बार्देज आनी मि. साल्सेत', 'विसरोंक दुख्ख-खोंत', 'आडांगी चोली आनी पात्रादोर चोलो', 'दोना अर्नेस्टिना', 'सोंवसार जिखली हांव', 'एके व्होकलेक तेग न्होवरे', 'शॅर होल्डर्स फायट', 'शेजाऱ्याची किजिलां', 'फस्ट प्रायज' अशी अनेक 'तियात्र' त्यांनी लिहिली. 1931 साली 'दोत' या 'तियात्रा'तून मिस ज्योर्जिना सोज, 1934 साली 'सन ऑफ जेरुजालें' 'तियात्रा'तून मिस डिसोझा आनी नंतरच्या काळात आपली पत्नी एर्मेलिंदा अशा अनेक नवनवीन स्त्री कलाकारांना त्यांनी आपल्या 'तियात्रां'तून अभिनयाची संधी दिली. स्त्री सुधारणेच्या दृष्टीने त्यांचे हे कार्य फार मोलाचे ठरते.

4.2.4 जे पी सोजालीन

जे पी सोजालीन यांचे मूळ नाव जुजे पास्कोल फेर्नांडीस परंतु सायब रोचा यांच्या 'रोमियो आनी ज्युलिएट' या 'तियात्रा'तून त्यांनी सर्वप्रथम रंगमंचावर प्रवेश केला आणि त्यातील सोजालीन ही भुमिका लोकप्रिय झाल्याने त्यांनी हेच नाव टोपणनाव धारण करून 'तियात्र' लेखन आणि दिग्दर्शन केले. त्यांनी प्रामुख्याने सामाजिक आणि धार्मिक 'तियात्र' लिहिण्यावर भर दिला. 'ड्रीम ऑफ लिस्बन', 'हें आसा तें', 'सात दुखी', 'सां फ्रांसिस शेवियर', 'दादलो व्होड वा वोस्तोरी', 'पाय तुज्याच तोंडान मागोन घेतलें', 'निमाण्यो चार वस्तू', 'पायची चूक वो मायची?', 'साद आमोरेचो', 'देवबापाची धूव', 'पातकांचें दार', 'ओशेच केल्यार सुदरोत गोंय', 'खोटी संगत', 'हांव तो म्हापशेंकार', 'फिलोमेनाचें सोपोन', 'देखो शेट उसका औरत', 'जेझु आनी जुदास', 'पाद्र आग्नेल', 'सांत आंतोन', भागीवोंत जुझेची खोरवोंत', 'तिकळें चेडूं', 'शेजारनीक हो गे मांय दोदलाचो?', 'पांच मिस्तेर ओर्काचे', 'पोयल्या चेड्याचो बाल्तीम', 'भोट आयलोलो पोंबुर्फेच्या फेस्ताक', 'आस्नोडेचो किस्तुलो' अशी अनेक 'तियात्र' त्यांच्या नावावर आहेत.

जे पी सोजालीन यांच्या 'तियात्रां'ची शीर्षके कोंकणी, इंग्रजी, पोर्तुगीज आणि हिंदी अशा विविध भाषांतील असल्याचे पहावयास मिळते. अनेक ठिकाणी त्यांनी सादर केलेले 'तियात्र' प्रयोग

प्रचंड लोकप्रिय झाले. गोवा मुक्ती नंतर सोजालीन यांनी गोव्यात त्यांच्या 'तियात्रां'चे प्रयोग करायला सुरुवात केली. विविध शहरांत त्यांच्या 'तियात्रां'चे प्रयोग, विशेषत: त्यांचे धार्मिक 'तियात्र' लक्षवेधी ठरले. नेपथ्य, वेशभूषा, पार्श्वसंगीत यासारख्या घटकांवरही त्यांनी विशेष लक्ष दिल्याने त्यांचे 'तियात्र' वेगळे ठरले.

4.2.5 ए. आर. सौज-फेर्रांव

'तियात्र' लेखन, 'कांतार' गीतकार, गायन, संगीत दिग्दर्शन अशा विविध भूमिका कोंकणी 'तियात्र' रंगमंचावर वठवणारे ए आर सौज-फेर्रांव यांनी 1925 साली बाजिलियो फुर्तादो यांच्या 'नाडपोण आमिगाचें' या 'तियात्रा'त 'प्रिन्सेस डायना' ही स्त्री भूमिका करून 'तियात्र' रंगमंचावर पाऊल ठेवले. इतर अनेक तियात्रिस्तांच्या 'तियात्रां'त भूमिका करणाऱ्या ए आर सौज फेर्रांव यांनी मुंबईत शिक्षणासोबतच 'तियात्र' आणि संगीत आत्मसात केले. 11 नोव्हेंबर 1936 रोजी मुंबई आकाशवाणी केंद्रावरून पहिलावहिला कोंकणी संगीत कार्यक्रम सादर करण्याचा मान त्यांना जातो. 'तियात्रा'च्या उभारणीच्या काळात विविध प्रकारे 'तियात्रा'चा स्वत:च खर्च भागवावा लागे आणि असा प्रयत्न ए आर सौज फेर्रांव देखील करीत. 'आल्मां सोर्गार वेतात', 'काजारी व्होंकोल', 'घातकेपोण', 'पँच पँच', 'जोतकाशी', 'सांतान बावडी', 'घोवयो पूत', आणि 'विश्वासघात' अशी सुमारे आठ तियात्रे त्यांनी लिहिली. आपल्या 'तियात्र' सादरीकरणातून मिळणारा निधी ते शाळा, हॉस्पीटल, इगर्ज यांच्या कामासाठी दान देत. त्यांच्या या कृतीतून त्यांचातील सामाजिक जाणीव आणि बांधिलकीची तळमळ लक्षात येते. 26 जानेवारी 1955 या दिवशी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात गोमंतकीय कला सादरीकरण करण्याची संधी त्यांना मिळाली. असा कोंकणी कार्यक्रम सादर करणारे ते पहिले गोमंतकीय ठरतात. 'तियात्रा'सोबतच त्यांनी चित्रपट क्षेत्रातही योगदान दिले. 'आमचें नोशीब', 'निर्मोण', सुखाचें सोपोन', 'मोजी घोरकान्न', 'कोर्तुबांचो संवसार', 'जिवीत आमचें अशें', 'भुंयारांतलो मनीस', 'बोगलांट' या चित्रपटांत त्यांनी भुमिका केल्या.

4.2.6 आलेशीन दे कांदोळी

आलेशीन दे कांदोळी यांचे मूळ नाव जुआंव बाप्तिस्त आलेशीन फेर्नांडीस. ‘तियात्र’ लेखक, दिग्दर्शक, ‘कांतार’ गीतकार आणि गायक अशी विविधांगी भुमिका साकारलेल्या आलेशीन दे कांदोळी यांनी 15 ऑगस्ट 1935 या दिवशी ‘पुतांची दुडवांची आस, आवयचे दिसग्रास’ हे पहिले ‘तियात्र’ गोव्यातील कांदोळी या गावात सादर केले. मुंबईत वेगवेगळया ‘तियात्रां’तून त्यांनी आपले सादरीकरणही केले. ‘तियात्र’ हा नाट्यप्रकार मुंबईबाहेरील वेगवेगळया प्रदेशांत घेऊन जाण्याचे कार्य आलेशीन दे कांदोळी यांनी केले. ‘तो बावटो धोर्माचो’, ‘म्हातारपोणार’, ‘राम राम भावोजी’, ‘गोंयचो पोसोरकार’, ‘मोटोरकार पाँक पाँक’, ‘कुरैयकार’, ‘आगा कुंपार’, ‘शेजारी’, ‘सांत सिसिलिया’, ‘भिरांकूळ शेवोट’, ‘व्हिद तियात्रिस्तांचें’, ‘एव खूंय वो पेस्कादोरेस्त’, ‘ते तेगूय लुच्चे’, ‘काळो बाजार वो ब्लॅक मार्केट’, ‘आमचो पोरदेश’, ‘बेबद्यांचो एस्ताद’, ‘मीस 1951’, ‘फेस्ताचे फेरयेंतलें फूल’, ‘चेडकवांकार’, ‘म्होजो घोव बासुरकार’, ‘पुतांची दुडवांची आस, आवयचे दिसग्रास’, ‘सोंवसारांत कोण कोणाचो’, ‘मुंडकारी’, ‘आमच्या शेताची पावणी’ असे अनेक ‘तियात्र’ त्यांनी लिहिले. आलेशीन दे कांदोळी यांची ‘कांतार’ गीते ऐकण्यासाठी ‘तियात्र’ आणि ‘कांतार’ रसिक विशेष गर्दी करत. त्यांची ‘कांतार’ गीते विविध सामाजिक आणि भावनिक प्रश्नांना भिडणारी असत. उदाहरणार्थ, स्वत:चा नवरा असतानाही परपुरुषाची आशा मनात बाळगणाऱ्या स्त्रीला ‘काजारी भोयणी’ या ‘कांतार’ गीतातून ते इशारा देतात. गोमंतकातील विविध सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे त्यांचे कसब ‘आमच्या शेताची पावणी’ यासारख्या ‘तियात्रा’तून पहावयास मिळते.

4.2.7 अँथनी डिसा

वयाच्या केवळ सोळाव्या वर्षी ‘झूज मोगाचें’ हे ‘तियात्र’ लिहून अँथनी डिसा यांनी ‘तियात्र’ रंगमंचावर पाऊल टाकले. ‘रोगताची भेट’, ‘घातकें कुमसार’, ‘विंगास’, ‘मांय ती मांय’, ‘सोदतां देवाचे नितीक’, ‘फारीकपोण’, ‘दोतोर फोटास’, ‘निर्भाग आशेचें’, ‘नोरेस फोडपी’, ‘पातोक दुबावाचें’, ‘इनाम जोल्माचो’, ‘गोंयकारांच्यो सोंवोयो’, ‘निसोंटोण फुडाराचें’, ‘इनाम पातकाचो’, ‘आया’, ‘लोजेचें बोगलांट’ अशी सुमारे सतरा ‘तियात्र’ त्यांच्या नावावर आहेत. आपल्या प्राथमिक शिक्षणानंतर मुंबईतील वास्तव्यादरम्यान त्यांनी ‘तियात्र’ लेखन केले. ‘तियात्र’ लेखनासोबतच त्यांनी

सुमारे चोवीस 'तियात्रां'चे दिग्दर्शन केले. यासोबतच 'तियात्रा'तील 'ओपनिंग कोरस' गायन करण्यासाठी त्यांना विशेष आमंत्रित करण्यात येत असे. 'तियात्र' मंचावरील कार्यासोबतच त्यांनी 'आमचें नशीब' आणि 'निर्मोण' या चित्रपटांतही काम केले आहे.

4.2.8 किड बॉक्सर

कायतान मान्युएल पेरेरा अर्थात किड बॉक्सर हे विनोदी 'कांतार' गीतकार आणि तियात्रिस्त. किड बॉक्सर, यंग मिनेझीस आणि मिंगेल रॉड या तिघांच्या किड-यंग-रॉड गटात ते त्रियो (तीन कलाकारांनी एकत्र येऊन केलेले) गायन करत. मुंबईत विविध प्रकारच्या नोकऱ्या करताना त्यांनी 'तियात्रा'त काम करायला सुरुवात केली. यंग मिनेझीस आणि मिंगेल रॉड या आपल्या दोन मित्रांसोबत त्यांनी 'किड-यंग–रॉड' ह्या आपला गट तयार केला. त्यांनी रचलेल्या 'कांतार' गीतांत म्हणींचा वापर मोठ्या प्रमाणात असे. राजकीय घटनांवर आधारित 'कांतार' गीते गायल्यामुळे त्यांना अटकही भोगावी लागली. किड हे स्वत: एक शीघ्रकवी होते आणि अनेकदा आपल्या आधी गायल्या गेलेल्या गीतांपेक्षा सरस ठरण्यासाठी जागीच नवीन शब्दयोजना करून गीत सादर करीत. 'ओस्तोरी', 'किडाचें सोपोन', 'एडिटर पंच दे बोंबाय', 'आंकवार आनी काजारी', 'जाता तें बोऱ्याक', 'भोयण', 'मिलितार', 'जुलूम', 'आमचीं नातालां', 'गोवा आमचो गांव', 'भाक्रूट', 'फुडार', 'म्होजो ओपराद', 'आदेवस वो निमणी भेट' अशा अनेक 'तियात्रां'चे लेखन त्यांनी केले.

4.2.9 जासींत वाज

गोवा मुक्तीपूर्वकाळापासून 'तियात्रा'च्या क्षेत्रात काम केलेल्या जासींत वाज यांना 'तियात्रा'च्या क्षेत्रातील चार्ली चॅप्लीन असेही म्हणतात. अर्नेस्ट रिबेलो यांच्या 'हांव पातकी' या 'तियात्रा'च्या माध्यमातून त्यांनी रंगमंचावर पदार्पण केले. आलेशीन दे कांदोळी यांच्या 'भासायलेलो न्होवरो' या 'तियात्रा'तील त्यांची विनोदी फारच गाजली आणि इथपासून त्यांच्या विनोदी 'तियात्र' कारकिर्दीला सुरुवात झाली. 'कुन्याद आनी मानां', 'बोदमास', 'न्यू फॅशन', 'बाँबे देखो', 'घोरवाली', 'मांय आनी सून', 'नितिदार', 'बॉटलेर सायब', 'शेवोट पुतांचो', 'मोवजा', 'दादागिरी',

‘आमच्यो बायलो’, ‘पोदोन’, ‘तो आमकां विसोरलो’, ‘घोवाचें घोर’, ‘मोग मोंतीर’, ‘बॅण्डवाला’ अशी अनेक ‘तियात्र’ त्यांनी लिहिली. त्यांच्या लेखनात विनोदाचे अंग अधिक प्रमाणात असे. गोमंतकाबाहेरील अन्य राज्यांत तसेच परदेशांत ‘तियात्रा’चा विस्तार करण्याचे कार्य त्यांनी केले.

4.2.10 सी. आल्वारीस

सेलेस्टीन सांतान फ्रांसिस्को आल्वारीस अर्थात् सी. आल्वारीस यांनी तब्बल 104 ‘तियात्र’ लिहून सर्वाधिक ‘तियात्र’ लेखनाचा विक्रम केला आहे. ‘कांतार’ गायक या नात्याने रंगमंचावर पाऊल ठेवलेल्या सी आल्वारीस यांनी नंतरच्या कालात ‘तियात्र’ लेखन सुरू केले. ‘आतां तुजो जांवूय हांव’, ‘आवोयचो शिराप’, ‘तुजे दोळे’, तुजें दुरीग म्होज्या भाटांत’, ‘मावोडेचें सूट’, ‘डॉक्टर सायमन’, ‘म्होजी व्होनी’, ‘बायल द तारवोटी’, ‘आतांच्यो सुनो’, ‘जुरामेंत’, ‘आशा’, ‘गोंयचो मोग’, ‘केन्ना उदेतेलो तो दीस’, ‘शेजारी कोंबो’ ही त्यांच्या काही गाजलेल्या ‘तियात्रां’ची नावे होय. ‘तोर हो तियात्रिस्त?’ या आपल्या ‘तियात्रा’त त्यांनी रंगबिरंगी प्रकाशयोजनेचा वापर करून पहिले ‘टॅक्निकलर ‘तियात्र’’ सादर करण्याचा मान मिळवला. त्यांच्या ‘तियात्रा’तील प्रश्न सामाजिक स्वरूपाचे असत. त्यातील संवादांचा दर्जाही उच्च असे. ते स्वत: उत्तम लेखक, दिग्दर्शक, नट आणि गायक असल्याने त्यांनी ‘तियात्र’ रंगमंचावरही अनेक नाविन्यपूर्ण प्रवाह सुरू केले.त्यांनी अनेक स्त्री कलाकारांना आपल्या ‘तियात्रा’च्या माध्यमातून रंगमंचावर आणले.

सी आल्वारीस यांच्या आगमनापूर्वी ‘तियात्रा’चा दर्जा फारच खालावला होता. तत्कालीन ‘तियात्रा’चा दर्जा मराठी वा अन्य नाटकांच्या तुलनेत उण्या प्रतीचा असून हळुहळू तो उंचावत आहे तसेच आगामी काळात ‘तियात्रा’चा दर्जा निश्चित उंचावेल अशी खात्री आहे परंतु अलिकडच्या काळापर्यंत शिक्षित लोक ‘तियात्र’ पहावयास येत नसत आणि त्यामुळेही ‘तियात्रा’चा दर्जा खालावला असे मत 1992 साली फादर फ्रॅडी दा कॉश्ता यांनी घेतलेल्या मुलाखतीदरम्यान मत त्यांनी व्यक्त केले होते. ‘तियात्रा’च्या दर्जात्मक सुधारणेसाठी समाजातील प्रत्येक घटकाचा आधार प्राप्त होणे आवश्यक आहे ही त्यांची भावना यावरून लक्षात येते. ‘तियात्रा’च्या लेखनासोबतच सादरीकरणाकडे

त्यांचे विशेष लक्ष असे. विविध देशांत 'तियात्रा'चे प्रयोग करून 'तियात्र' अधिकाधिक व्यापक करण्याचे कार्य करतानाच त्यांनी चित्रपटांसाठी संवाद लेखन, अभिनय, गीतलेखन केले.

4.2.11 अँथनी मेंडीस

अँथनी मेंडीस यांच्या नावावर 'पांडू बार्बेर', 'गोंयकार', 'बोबोरजी वो कुजनेर', 'पेंसांव वो तेंसांव', 'कुणबी इर्मांव', 'दुसरेपोणीं काजार', 'तिकळी सून', 'आर्तिमीझ', 'वोनयेचो जुरामेंत', 'एडिटराचें नोशीब', 'गिराणाचो पूत', 'बेकार जांवूय', 'रोड टू म्हापशें' असे एकूण 15 'तियात्र' आढळतात. त्यांच्या 'कांतारां'त इंग्रजी-कोंकणी भाषांचा वापर दिसे.

4.2.12 मिंगेल रॉड

मिंगेल रॉड हे सी आल्वारीस यांचे समकालीन 'तियात्र' लेखक. मिंगेल रॉड यांच्या 'तियात्र' लेखनाची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यांच्या 'तियात्रां'ची शीर्षके लक्षवेधी आणि सुटसुटीत असत. 'तियात्रा'तील शोकान्तिका, कथानक, विनोद हे घटक त्यांच्या 'तियात्रा'चे वेगळेपण ठरतात. आपल्या 'तियात्रां'तून त्यांनी गोमंतकीय समाजाचे विविध सामाजिक प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या 'कांतारां'त तत्त्वज्ञान दिसे. अवघ्या 32 व्या वर्षी या जगाचा निरोप घेतलेल्या या 'तियात्र' लेखकाने 'दुडवांचो फोर्स', 'गोरीब शेजारी', 'घोरचें केस्तांव', 'जुआंव साश्टीकार', 'निड्डूकाय', 'ओपन टू क्लोज', 'बापुलभाव', 'मेस्त दोर्जी', 'लेंबडो सांतान', 'सिवील मॅरेज', 'तारवोटी इर्मांव', 'कासादोर कायतान', 'पोब्र फिदाल्ग', 'मानेल पाडकार', 'बाक्रू उगोत जालोना?', 'इर्मावाचें काजार', 'नोरेस फोंडपी', 'ओडल्या आबाचेर शेस्त पोडलें', 'लॉर्ड फकीर', 'इंत्रूज वो कार्नावाल', 'व्हीद चुरचुऱ्यांचें', 'सोमेस्तांचो रिणकारी', 'इमट्यांचे भोगणार', 'एस्ताद तारवोट्यांचो', 'कुन्याद बोमोयकार', 'आफ्रीककार बायल', 'हॅल्मॅटकार बाब', 'मिलेर लिब्रांचो', 'कोडू संवसार' असे 'तियात्र' लिहिले. 'तियात्रा'चे शीर्षकही लक्षवेधी असावे यासाठी आपल्या 'तियात्रां'ना दोनशब्दी शीर्षक देताना पहिल्या शब्दात विशेषण आणि दुसऱ्या शब्दात नाम अशी व्यवस्था त्यांनी केलेली दिसून येते.

4.2.13 कामत दे असोळणां

रमाकांत बाबुसो कामोतीम हे त्यांचे मूळ नाव. ‘तियात्रा’च्या आरंभीच्या काळातील ते एक हिंदू ‘तियात्र’ कलावंत. ‘मांय हो गुन्याव तुजो’, ‘म्होजो खुरीस’, ‘वोतलाय तोंशे भोर’, ‘दोतीक लागोन’, ‘सोरो’, ‘इनोसेंत’ असे अनेक ‘तियात्र’ त्यांनी लिहिले. त्यांच्या ‘कांतारां’त मूल्यांची चर्चा असे. आपल्या आगळयावेगळया शैलीत ‘कांतार’ गायन करण्यासोबतच ते युगल गीते गात असत.

4.2.14 एम् बॉयर

भारत सरकारचा संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसेच पद्मश्री पुरस्कार प्राप्त एकमेव कोंकणी तियात्रिस्त म्हणजे एम्. बॉयर. मान्युएल सांतान आगियार हे त्यांचे मूळ नाव. शालेय दशेतूनच ते ‘तियात्रा’त भूमिका करीत परंतु शालेय विद्यार्थ्यांनी ‘तियात्रा’त भूमिका करण्यावर बंदी असल्याने आणि त्यासाठी दंड केला जात असल्याने त्यांनी सुरुवातीस ‘मान्युएल रेबेकांव’, ‘एम्. टॅलर’ अशी टोपणनावे धारण करून ‘तियात्रा’त काम केले. अखेरीस प्रसिद्ध अमेरिकी कलाकार चार्ल्स बॉयर याच्या नावातील बॉयर आणि आपल्या मान्युएल या मूळ नावाचे आद्याक्षर एकत्र करून त्यांनी ‘एम्. बॉयर’ हे टोपणनाव धारण केले. ‘रिणकारी’ हे त्यांचे पहिले ‘तियात्र’ त्यांनी वयाच्या अठराव्या वर्षी सादर केले. आठ अंकाच्या आकारात रंगमंचावर फिरत ‘कांतार’ गाण्याची त्यांची शैली असे. आजही ही शैली त्यांच्याच नावाने ओळखतात. समाजातील विविध प्रश्न त्यांनी आपल्या ‘तियात्रां’तून मांडले. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, वैवाहिक जीवन यासारख्या सामाजिक प्रश्नांवर त्यांचे ‘तियात्र’ आधारित असत. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सुमारे पंचवीस ‘तियात्र’ लिहिले.

4.2.15 रॉबीन वाज

जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस यांच्या प्रेरणेतून ‘तियात्र’ लेखन करत रॉबीन वाज यांनी ‘तियात्र’ लेखनाला प्रारंभ केला आणि एकूण सत्तावीस ‘तियात्र’ लिहिले. ‘आजेंत मोंतेर’, ‘ओपिनियन पोल’, ‘प्रेझिडेंट सद्दाम हुसेन’, ‘डॉन बॉस्को डॉमनिक सावियो’, ‘फातिमा सायबीण’,

‘बार्राबास’, ‘सां जुआंव बाप्तिस्त’, ‘घातकी सालोमे’, ‘रोचणार’, ‘पूत कोणाचो?’, ‘कुंपार कुमार’, ‘कोत्रीनाक फोसोयलें’, ‘बियांतीन’, ‘बेंसाचे वांटे’, ‘आदांव आनी एव’, ‘दादा’, ‘शिंकोन ब्रूत’, ‘बेबदो पूत’, ‘खोशे भायर न्हूय काजार’, ‘आफ्रिककार न्होवरो’ हे आणि अन्य काही ‘तियात्र’ त्यांनी लिहिले. गोवा मुक्तीसाठी झटणाऱ्या ‘आझाद गोमंतक दल’ या संस्थेचे सदस्य आणि स्वातंत्र्यसेनानी असलेल्या रॉबीन वाज यांनी आपल्या ‘तियात्रां’तून राष्ट्रभक्ती जागृत करण्याचे कार्य केले. ‘आजेंत मोंतेर’ या आपल्या ‘तियात्रा’तून त्यांनी पोर्तुगीज अधिकाऱ्यांचा क्रूरपणा मंचावरून व्यक्त केला. गोवामुक्ती नंतरच्या कालखंडातील एक अतिशय महत्त्वाची घटना म्हणजे 1966 सालचा जनमत कौल. या घटनेचे चित्रण करणारे ‘ओपिनियन पोल’ हे ‘तियात्र’ही त्यांनी लिहून सादर केले. लोककलाकार असलेल्या रॉबीन वाज यांनी आपल्या ‘तियात्रा’त अनेक लोकगीतांचाही अंतर्भाव केला.

4.2.16 आल्फ्रेड रोज

रुजारियो आल्फ्रेड फर्नांडीस अर्थात् गोड गळ्याच्या आल्फ्रेड रोज यांना ‘मेलडी किंग’ असेही ओळखतात. ‘हेंच तें काराण’ हे आल्फ्रेड रोज यांनी लिहिलेले पहिले ‘तियात्र’ होय. या व्यतिरिक्त ‘रोगताक तानेलेलो’, ‘लाखपोती नोवरो’, ‘दोतोर आदवोगाद’, ‘भांगाराचो होती’, ‘आंगवोण्यांची व्होकोल’, ‘मुनीस वो देंवचार’, ‘डायरेक्टर सायब’, ‘पेंसावकार’, ‘नातालांची भेंट’, ‘म्हाका पोय तुका पोय’, ‘सोमेस्तांचो कुंपार’, ‘चुरचुऱ्यांचें काजार’ असे इतरही ‘तियात्र’ त्यांनी लिहिले. ‘तियात्र’ लेखक, ‘कांतार’ गीतकार, संगीतकार, ‘तियात्र’ अभिनेता, दिग्दर्शक अशा विविध भूमिका त्यांनी पार पाडल्या. जुआंव आगोस्तीन फेर्नांडीस यांची ‘कांतार’ गीतांची पुस्तके प्रकाशित करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. स्वत: शिक्षित आणि इंग्रजी भाषेचा चांगला अभ्यास असल्याने त्यांनी इंग्रजीत ‘कांतार’ गीते लिहिली. त्याचप्रमाणे इंग्रजी-कोंकणी मिश्र ‘कांतार’ गीतेही त्यांनी रचली.

4.2.17 प्रेम कुमार

प्रेम कुमार यांचे मूळ नाव पिटर डिकोस्टा. हिंदी चित्रपटात काम करण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांनी प्रेम कुमार हे टोपणनाव धारण केले. ‘म्हजो पूत’, ‘काकूत’, ‘दूख्ख’, ‘पेल्याचे वोस्तूंची आशा कोरूं नये’, ‘फुलां आनी कांटे’, ‘जवान’, ‘वावराडी’, ‘मुर्तीकार’, ‘अब्दुल नारायण डिसोजा’, ‘पिसो’, ‘आंगवण’, ‘रीण’, ‘घातकी व्होनी’, ‘नो वेकन्सी’, ‘मारिया मागदालीन’, ‘आमची भास’, ‘जिवीत एक सोपोन’, ‘उपकार नासलेलो’, ‘कोणाक म्हुणों माय’, ‘घोर मातयेचें’, ‘फोटकिरो’, ‘उपकार’, ‘उगडास’, ‘दोर्जी’, ‘गोरीब’, ‘पाय’, ‘नो टायम’ असे अनेक ‘तियात्र’ त्यांनी लिहिले. त्यांचे बहुतांश ‘तियात्र’ सामाजिक विषयांवर आधारित असत परंतु ‘मारिया मागदालीन’ हे एकमेव धार्मिक ‘तियात्र’ त्यांनी लिहिले. सामाजिक आशयाच्या आणि दुर्बळ लोकांच्या जीवनावर आधारित त्यांच्या ‘तियात्रां’त वास्तवदर्शी चित्रण असे. गरिबांवरील अन्यायाला वाचा फोडण्याचे काम त्यांनी ‘मोर्तीकार’ या ‘तियात्रा’तून केले. समाजाची चिंता, गोरगरिबांविषयीची तळमळ आणि त्यांच्याप्रती असलेली करुणा त्यांच्या ‘तियात्रां’त दिसते. प्रेमाद्वारे आपण उच्च स्तरावर पोचू शकतो आणि शत्रुत्व, अहंकार यासारखे दुर्गुण मनुष्याचा ऱ्हास करतात ही शिकवण त्यांच्या ‘तियात्रां’तून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

4.2.18 तोमाजीन कार्दोज

‘तियात्रा’च्या क्षेत्रातील आजच्या घडीचे आघाडीचे व्यक्तिमत्व अशी ज्यांची ओळख आहे त्या तोमाझीन कार्दोज यांचा जन्म 14 एप्रिल 1946 या दिवशी झाला. त्यांचे मूळ नाव लांबेर्टो थोमस कार्दोजो. सिमोनिया रिटा माशादो आणि आसीस कार्दोज यांच्या पोटी जन्माला आलेले तिसरे अपत्य म्हणजे तोमाजीन. बालपणापासून उत्साही स्वभावाच्या असणाऱ्या तोमाझीन यांनी वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी राज्य स्तरावरील पत्रलेखन स्पर्धेत पारितोषिक पटकावले आणि त्यांच्या लेखनाला प्रारंभ झाला. हे बक्षीस म्हणजे आपल्या चिंतनशीलतेचे यश होते असे ते म्हणतात. शिक्षकी पेशात कार्य करतानाच त्यांनी ‘तियात्रा’च्या क्षेत्रात लेखन, दिग्दर्शन, गायन अशा विविध भूमिका पार पाडल्या.

गोवा ‘तियात्र’ अकादमीचे संस्थापक अध्यक्ष या नात्याने त्यांनी दिलेले योगदान ‘तियात्रा’च्या क्षेत्रातील अतुलनीय कार्य म्हणावे लागते. ‘तियात्र’ अकादमीच्या संस्थापक अध्यक्षपदी त्यांनी ‘तियात्रा’च्या विकासासाठी मूलभूत योजना आणि कार्याची आखणी केली. कला मोगी या स्वत:च्या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी ‘तियात्रा’च्या प्रसारासाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. अद्वितीय प्रतिभाशक्ती लाभलेल्या तोमाझीन कार्दोज यांनी पस्तीस ‘तियात्रां’चे लेखन केले आहे. कला अकादमीच्या ‘तियात्र’ स्पर्धेच्या निमित्ताने यातील बहुतांश ‘तियात्र’ त्यांनी लिहिले आहेत.

‘म्होवाळ वीख’, ‘सोमाज सेवा’, ‘उतरां आनी करण्यो’, ‘हेलो अंकल’, ‘कांटेच कांटे’, ‘ओंतोस्करण आनी कायदो’, ‘ओर्थ’, ‘सांखळयो’, ‘भुरगीं आमचीं गिरेस्तकाय’, ‘आयचो सोमाझ’, ‘दिता तोशें घेता’, ‘नोवी दिशा’, ‘गोवा गोईंग गॉन’, ‘झॉगझॉगता तितलें भांगर न्होय’, ‘आमी सोगलो एक’, ‘एक्सिंदेंत’, ‘काळोख आनी उजवाड’, ‘इश्ट’, ‘हांवुच तो’, ‘इन्स्पेक्टर’ ही आणि अन्य तियात्रे त्यांच्या नावावर आहेत. देवनागरी लिपीत ‘तियात्र’ लेखन करणाऱ्या मोजक्या ‘तियात्र’कारांत त्यांच्या समावेश होतो. त्यांच्या ‘तियात्रां’चे विषय सामाजिक आशयाला धरून असतात. त्यांच्या ‘तियात्रां’तील भाषा सर्वसामान्य रसिकाला कळण्यासारखी असल्याने देखील त्यांची तियात्रे अधिक लोकप्रिय ठरली आहेत. सामाजिक आशय मांडण्यासोबतच आपल्या ‘तियात्रा’तून त्यांनी वैचारिक बोध देण्याचाही प्रयत्न केला आहे. समाजातील नैतिकता आणि वैचारिक जाणीव समृद्ध व्हावी या दृष्टीने त्यांचे ‘तियात्र’ लेखन महत्त्वाचे ठरते. ‘तियात्र’ लेखनातील भरीव योगदानासाठी त्यांना 2009 सालच्या गोवा राज्य साहित्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

4.3 समारोप

मराठी संगीत नाटक आणि ‘तियात्र’ या दोहोंचा विचार करता दोन्ही साहित्यकलाप्रकारांतील लेखकांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पूर्वसूरींचा आदर्श आणि प्रेरणा डोळयांसमोर ठेवून त्यानुसार या साहित्यकलाप्रकाराची सुरुवात आणि वाटचाल केलेली दिसून येते. या दोन्ही साहित्यकलाप्रकारांना भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक अशी स्वतंत्र चौकट लाभल्याने दोन्ही साहित्यकलाप्रकारांचा प्रवास

विविध साम्यभेदांनी युक्त असा असलेला पाहता येतो. ‘तियात्र’ लेखकांनी ‘तियात्र’ लेखनासोबतच गीतलेखन, दिग्दर्शन, अभिनय, तांत्रिक योजना, रंगभूषा, वेशभूषा अशा अन्य बाबींतही योगदान दिलेले आहे. मराठी संगीत नाटककारांनी नाट्यलेखन, दिग्दर्शन, गीतलेखन या बाबी हाताळलेल्या दिसतात. मराठी संगीत नाटकातील आशय हा कालानुरूप विविधांगी असलेला पहावयास मिळतो परंतु ‘तियात्रां’तील आशय हा काही धार्मिक आशयांच्या ‘तियात्रां’चा अपवाद वगळता, प्रामुख्याने सामाजिकच होता. गोवा मुक्तीनंतरच्या काळात राजकीय, भाशिक, वैचारिक अशा ‘तियात्रां’ची भर पडलेली पहावयास मिळते. गोवा कला अकादमीच्या ‘तियात्र’ स्पर्धेच्या निमित्ताने ‘तियात्र’लेखनाची एक शास्त्रीय चौकट सिद्ध झाली आणि त्याचबरोबर ‘तियात्रां’च्या संहिता प्रकाशित करण्याची पद्धतही सुरू झाली. रोमी लिपीतून लिहिल्या जाणाऱ्या बहुतांश ‘तियात्रां’सोबतच काही मोजक्या ‘तियात्रां’चे लेखन देवनागरी लिपीतही झालेले आहे. ख्रिस्ती समाजबहुल असणाऱ्या ‘तियात्रा’त आज लक्षणीय प्रमाणात हिंदू ‘तियात्र’ लेखक, अभिनेते, तंत्रज्ञही पहावयास मिळतात. मराठी संगीत नाटकाच्या संदर्भात पाहता, संस्कृत परंपरेतून आलेल्या लेखकांनी दर्जेदार संस्कृत आणि इंग्रजी कलाकृतींचा मराठी अनुवाद प्रारंभीच्या काळात केलेला दिसतो. पौराणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध विषयांवर मराठी संगीत नाटककारांनी लेखन केले. संहिता लेखन, नाट्यगीत लेखन, दिग्दर्शन या जबाबदाऱ्या प्रारंभीच्या काळातील नाट्यलेखकांनी सांभाळल्या असल्या तरी नंतरच्या काळात गीत लेखन, संगीत दिग्दर्शन, नाट्य दिग्दर्शन या बाबी लेखकाव्यतिरिक्त इतरांनीही केलेल्या दिसून येतात. मराठी संगीत नाटककार आणि ‘तियात्र’ लेखक यांनी आपपल्या परीने हे दोन्ही साहित्यकलाप्रकार विकसित करण्यासाठी कालानुरूप बदल आणि सुधारणा केल्याचे दिसून येते. मराठी संगीत नाटकांची परंपरा आज प्रचंड प्रमाणात खंडीत झाल्याचे दिसून येते मात्र ‘तियात्रा’च्या क्षेत्रात नवनवीन कल्पना, विचार आणि सुधारणांसह विविध व्यक्ती भरीव कार्य करताना दिसून येतात.

*****

4.4 संदर्भग्रंथ सूची

1. देशपांडे वि. भा., मराठी नाटक-नाटककार : काळ आणि कर्तृत्व (खंड 1), दिलीपराज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 31 मे 2008
2. देशपांडे वि. भा., मराठी नाटक-नाटककार : काळ आणि कर्तृत्व (खंड 2), दिलीपराज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 31 मे 2008
3. देशपांडे वि. भा., मराठी नाटक-नाटककार : काळ आणि कर्तृत्व (खंड 3), दिलीपराज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती 31 मे 2008
4. दुबे, चंदूलाल, कोटबागे, व्यंकटेश, हिंदी आणि मराठी रंगभूमीचे जनक विष्णुदास भावे, पद्मगंधा प्रकाशन, पहिली आवृत्ती 26 जानेवारी 2013
5. डहाके, वसंत आबाजी, मराठी नाटक आणि रंगभूमी विसावे शतक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, 2019
6. भगत, दत्ता, मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास (आरंभापासून 1990 पर्यंत), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती, 2019
7. प्रभू, परेश, गोपाळकृष्ण भोबे चरित्र आणि साहित्य (संपा.), गोवा मराठी अकादमी, 13 फेब्रुवारी 2021
8. थळी प्रकाश, 'तियात्रा'चो इतिहास, गोवा कोंकणी अकादमी, पहिली आवृत्ती 1993
9. Mazarello, Wilmix, 100 Years of Konkani Tiatro, Directorate of Art & Culture, Govt. of Goa, First Edition, 2000
10. Gonsalves, Marcos, Kristanvancho Zagor Sod-Vavr, Dalgado Konkani Akademi, Panaji, First Edition, 2013
11. नायक, पुंडलिक, रंगपाट (कोंकणी रंगमाचयेचो नियाळ), अपुरबाय प्रकाशन
12. फेर्नांडीस, कॉज्मा, 'तियात्रां'त दिसपी गोंयच्या समाजाचें चित्रण (पीएच.डी. प्रबंध), गोवा विद्यापीठ, 2016

13. Fernendes, Andre Rafael, When The Curtains Rise : Understanding Goa's Vibrant Konkani Theatre, Tiatr Academy of Goa, 2010.

14. Kale, Pramod, Tiatr : Expression of the Live Popular Culture (in Dantas, Norman (Ed.), The Transforming of Goa, Pg. 137-167), The Other India Press, Mapusa-Goa, 1999

15. Bambolkar, Tanvi, Folk Theatre in Goa : A Critical Study of Select Forms (Ph.D. Thesis), Goa University, January 2018

16. Fernandes, Carlos, Phadte, Prashant, Gadekar, Vinda, Tiatr Machi (An anthology of articles on tiatr - Part 1), Krishnadas Shama Goa State Central Library, June 2017

17. Fernandes, Carlos, Phadte, Prashant, Gadekar, Vinda, Tiatr Machi (An anthology of articles on tiatr - Part 2), Krishnadas Shama Goa State Central Library, May 2018

18. Fernandes, Carlos, Phadte, Prashant, Gadekar, Vinda, Tiatr Machi (An anthology of articles on tiatr - Part 3), Krishnadas Shama Goa State Central Library, October 2020

19. फर्नांडीस, कॉज्मा, कोंकणी 'तियात्रा'ची सद्यस्थिती आनी फुडार (अतिथी व्याख्यान), कोंकणी अध्ययनशाखा, गोवा विद्यापीठ, 1 सप्टेंबर 2023

20. गॉमीश लुई, कोंकणी नाटक आनी 'तियात्र' : कांय वेगळेपणां